तपास करत आहेत.

# यंदाचा लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ऑनलाइन

**मुंबई :** यंदाचा लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे (लिफी) ऑनलाइन पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे यावेळी मोठ्या संख्येने प्रेक्षकांना महोत्सवातील चित्रपट पाहता येणार आहे. त्यासाठी प्लेक्सिगो (यूएफओ मूव्हीजची उपकंपनी) हे मोबाईल अॅप प्रेक्षकांना डाऊनलोड करावे लागेल. यंदा महोत्सवाचे पाचवे वर्ष असून १३ डिसेंबर हा महोत्सव सुरू राहणार आहे. महोत्सवाचे संचालक माधव तोडी असून संकल्पना व आखणी विवेक वासवानी यांनी केली आहे. दिग्दर्शक अनंत महादेवन, संगीतकार आनंद-मिलिंद, प्रवेश सिप्पी, दिव्य सोलगामा यासारख्या नामवंतांचा विविध सत्रात सहभागी होणार आहे. दरम्यान, महोत्सवात चित्रपट निर्माते आणि वितरक एन. एन. सिप्पी यांना श्रद्धांजली वाहून त्यांचे 'वो कौन थी', 'गुमनाम', 'देवता', 'सरगम' आदी चित्रपट दाखविण्यात येणार आहे. तसेच 'पापा कहते हैं' चित्रपट आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसा लाभलेला 'मुक्ती भवन' आदी चित्रपटही पाहता येणार आहे.